# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

### स्वातंत्र्यदिन कार्यक्रम

लोकमत पुणे, मंगळवार, दि. १८ ऑगस्ट २०१५ ८



येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. या वेळी उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी.

# वृक्षारोपण करून दिली ध्वजाला मानवंदना

## राजगुरुनगर परिसर : पंचवीस झाडे लावून नगर परिषदेचा पहिला स्वातंत्र्यदिन साजरा

राजगुरुनगर : राजगुरुनगरमध्ये ६९ वा स्वातंत्र्य दिन शाळा, महाविद्यालये आणि संस्थांमध्ये उत्साहाने साजरा करण्यात आला. राजगुरुनगर नगर परिषदेने वृक्षारोपण करून स्वातंत्र्य दिन साजरा केला. राजगुरुनगरच्या वेशीवर दर वर्षी सरपंच ध्वजवंदन करायचे; यंदा नगर परिषद झाल्याने नगराध्यक्ष बापू थिगळे यांच्या हस्ते ध्वज फडकविण्यात आला. त्यानंतर नगर परिषदेमध्ये उपनगराध्यक्ष सारिका घुमटकर यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले.

रोजच्या भाजीबाजारात नगराध्यक्ष आणि नगरसेवकांनी २५ झाडे लावून नगर परिषदेचा पहिला स्वातंत्र्य दिन साजरा केला. शासकीय प्रथेप्रमाणे उपविभागीय अधिकारी हिंमतराव खराडे यांच्या हस्ते तहसीलदार कार्यालयासमोर ध्वजवंदन करण्यात आले. तहसीलदार प्रशांत आवटे, नायब तहसीलदार माणिकराजे निंबाळकर, लता वाजे उपस्थित होते.

उपविभागीय पोलीस अधिकारी संजयकुमार पाटील, पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी आणि पोलीस व होमगार्डच्या कर्मचाऱ्यांनी सलामी दिली. गावातील नागरिक या वेळी उपस्थित होते. हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

घोषपथक आणि एनसीसी कॅडेट अग्रभागी होते. हुतात्मा राजगुरु आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना मानवंदना देण्यात आली. राजगुरुनगर सहकारी बँकेत अध्यक्ष किरण आहेर यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. उपाध्यक्ष परेश खांगटे आणि संचालक व सेवकवर्ग हजर होता. त्यानंतर सभा झाली. हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांच्या राष्ट्रीय स्मारक असलेल्या वाड्यावर मुबारक आतार या नागरिकाच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. स्मारक समितीचे अध्यक्ष अतुल देशमुख, सुशील मांजरे उपस्थित होते.

◆ खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते महाविद्यालयात ध्वजवंदन करण्यात आले. एनसीसीच्या कॅडेट्सनी सलामी दिली. या प्रसंगी महाविद्यालयातील 'गंध कस्तुरीचा' या स्वातंत्र्य दिन विशेषांक भित्तीपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले. संस्थेचे संचालक ॲड. मुकुंदराव आवटे, बाळासाहेब सांडभोर, ज्ञानेश्वर करंडे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. बी. शिंदे या वेळी उपस्थित होते. महात्मा गांधी विद्यालयात अध्यक्ष हरिभाऊ सांडभोर यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख